॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

■ अहिल्यानगर ■ रविवार, दि. २० सप्टेंबर २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ८५ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com

**✻ सुविचार ✻**

आजचे कष्ट हे उद्याचे
उज्वल भविष्य आहे.

## फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### घोडे फरार

रात्र थोडी
सोंगे फार
टांगा पलटी
घोडे फरार

शंभरची गर्दीला
पुरे जवळचे यार
जग जिंकताना
हसत घ्यावी हार

## SPOT NEWS

### साखर साठ्याची मर्यादा वाढविली

**● नवी दिल्ली** – गेल्या काही दिवसापासून साखरेच्या दरात वाढ होत असल्याचे चित्र आपल्याला पाहायला मिळाले होते. लोक साखरेच्या वाढत्या किमतींमुळे चिंतेत होते. त्यातच आता साखरेच्या दरात २५ टक्क्यांची घसरण झाली आहे. दरम्यान, आता सरकारने साखर साठा करण्याच्या नियमांत बदल केले आहेत. या नव्या बदलानुसार साखर खरेदीदारांना साठा करण्याची मर्यादा १५ दिवसांवरून ३० दिवसांपर्यंत वाढविली आहे. या निर्णयामुळे साखरेच्या किमती आणखी कमी होण्याची शक्यता आहे. दरम्यान, खुल्या बाजारातून खरेदी केलेल्या साखरेच्या साठा मर्यादेत कोणताही बदल होणार नाही. केंद्र सरकारने मोठ्या प्रमाणात साखर खरेदी करणा-यांसाठी साठा करण्याची मर्यादा आता ३० दिवसांपर्यंत वाढविली. मात्र, अतिरिक्त साखर साठा केवळ आयात केलेल्या साखरेतूनच खरेदी केला जाऊ शकतो, अशी अट घातली आहे. याचा अर्थ केंद्र सरकारने मोठ्या प्रमाणात साखर वापरणाऱ्या कंपन्यांसाठी साठा करण्याची मर्यादा वाढविली आहे.

### गणेशोत्सवामुळे नारळाच्या दरात वाढ

**● पुणे** – गणेशोत्सवामुळे देवाला वाहणाऱ्या तोरणाच्या नारळासह मोदक, करंज्या आदीसाठी वापरण्यात येणाऱ्या नारळांना बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी वाढली आहे. त्यामुळे बाजारात रोज २ ते २.५ लाख नारळांची विक्री होत आहे. उत्सव काळात ही मागणी कायम राहणार असल्याचा अंदाज मार्केटयार्डमधील नारळ व्यापाऱ्यांनी व्यक्त केला. मागील दोन महिन्यांत शेकड्याच्या दरात ५०० रुपयांनी वाढ झाली आहे. दरवर्षीच उत्सव काळात नारळांना मागणी वाढत असते. यंदाही मागणी कायम आहे. केटरिंगवाले, विविध प्रकारचा प्रसाद विक्रेत्यांसह नारळ विक्रेत्यांकडून मागणी वाढली आहे. पुढील काळातील सण आणि उत्सवामुळे दिवाळीपर्यंत वाढलेली मागणी कायम राहणार असल्याचा अंदाजही व्यक्त करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत बाजारात तामिळनाडू, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातून नारळाची आवक होत आहे. गणेशोत्सव आणि नारळांचे तोरण हे समीकरणच आहे.

## नांदेडात दुष्काळाच्या बैठकीत

# नेत्यांचा काजू, बदामावर ताव

**विरोधक आक्रमक । मुख्यमंत्र्यांकडून प्रशासनाच्या कारभारावर नाराजी**

**● मुंबई । वीरभूमी–**

महाराष्ट्रात सध्या भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. यंदाच्या पावसाळ्यावर एल निनोचा प्रभाव तीव्रतेने जाणवत आहे. मागच्या काही दिवसांपासून पाऊस गायब झाला आहे. यामुळे राज्यातला शेतकरी हवालदिल झाला आहे. पावसाअभावी शेती संकटात आली आहे. पाऊस नसल्याने शेतकरी पेरणी करू शकत नाही. दुसरीकडे जी पेरणी केली होती, ते पीक वाया जात आहे. या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांकडून राज्यात कोरडा दुष्काळ लवकरात लवकर जाहीर करावा अशी मागणी होत आहे.

राज्यातला शेतकरी दुष्काळाच्या या झळा सोसत असताना आज नांदेडमध्ये कृषी मंत्री दत्तात्रय भरणे गेले होते. दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी ते गेले होते. त्यावेळी बैठकीत चक्क मंत्री आणि आमदारांसाठी काजू, बदाम देण्यात आले. त्यावरुन राज्यात संतापाची लाट उसळली आहे.

दुष्काळाच्या स्थितीवर चर्चा सुरू असताना लोकप्रतिनिधींचा जोरदार पाहुणचार करण्यात आला आहे. लोकप्रतिनिधींना चक्क काजू, बादामाचा खुराक देण्यात आला आहे. धक्कादायक म्हणजे आठ जिल्ह्यातील



दुष्काळी परिस्थितीवर चर्चा करताना मंत्री आणि आमदार चक्क काजू बादाम खात असल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. यात खासदार संजय जाधव बादामावर ताव मारताना दिसत आहेत. राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी परिस्थिती लक्षात आणून दिल्यानंतर काजू आणि बादामच्या प्लेट तातडीने हटवण्यात आल्या.

राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी या प्रकारावर संताप व्यक्त केला आहे. अधिकाऱ्यांना डोके नाहीये का? असा संतप्त सवाल संजय शिरसाट यांनी व्यक्त केला आहे. पूर्वनियोजित कार्यक्रमामुळे मला या बैठकीला जाता आलं नाही. मात्र आमचे अधिकारी तिथे गेले आहेत. दत्ता भरणे त्यांची जबाबदारी पार पाडत आहेत. अधिकाऱ्यांवर काही गोष्टींची जबाबदारी असते. कोणत्या विषयावर बैठक सुरू आहे आणि आपण काय करतो हे अधिकाऱ्यांना समजले पाहिजे असा संताप शिरसाट यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाच्या ढिसाळपणावर नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, शासकीय बैठकांमध्ये ड्रायफ्रूट्स ठेवण्याची प्रशासनाची एक पारंपरिक पद्धत असते, पण अशा गंभीर विषयांच्या बैठकीत या गोष्टी नक्कीच टाळल्या पाहिजेत. कोणी मुद्दाम दुष्काळात असे केले असे म्हणणे चुकीचे ठरेल, तरीही अधिकाऱ्यांनी आणि प्रशासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून संवेदनशीलता बाळगलीच पाहिजे.

विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या प्रकारावरून सरकारवर जोरदार हल्ला चढवला आहे. राज्यात शेतकरी पाण्याअभावी, विजेअभावी आणि पिके जळाल्यामुळे हवालदिल झाला आहे. कर्जाच्या विळख्यात शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत असताना, दुष्काळाच्या बैठकीत बसून काजू-बदाम चघळणे म्हणजे शेतकऱ्यांच्या दु:खाची क्रूर थट्टा आहे. शेजारच्या कर्नाटक सरकारने तत्काळ निर्णय घेत दुष्काळ जाहीर केला; परंतु महाराष्ट्रातील निष्क्रिय सरकार केवळ बैठकांचे सोपस्कार करत मुहूर्त शोधत बसले आहे. सरकारने तोंडदेखलेपणा बंद करून तातडीने दुष्काळ जाहीर करावा असे अंबादास दानवे म्हणाले.

मराठवड्यातला शेतकरी कोणत्या परिस्थितीतून जातोय. दुष्काळ जाहीर करण्यासाठी कसल्या बैठक घेता? रेस्ट हाऊसवर बसून कसल्या बैठका करता, धरणं कोरडी पडली आहेत. रात्रीचा काही जिल्ह्यात तुरळक पाऊस पडला आहे. मुख्यमंत्र्यांनी तात्काळ दुष्काळ जाहीर करण्याची भूमिका का घेऊ नये? चमकोगिरी हे मंत्री करतायत. शेतकरी दु:खी, खिन्न अवस्थेत असताना त्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचं काम हे शिंदेंचे मंत्री करत आहेत' अशा शब्दात शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी टीका केली.

## सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांना आरबीआयचा दणका!

**● मुंबई । वीरभूमी–**

राष्ट्रवादी पक्षाचे नेते तथा राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांना मोठा धक्का बसला आहे. बाबासाहेब पाटील यांच्यावर आरबीआयने बडतर्फी कारवाई केली. गेल्या १० वर्षापासून बाबासाहेब पाटील हे लातूर जिल्हा बँकेचे संचालक राहिले आहेत. त्यामुळे त्यांनी आरबीआयच्या नियमाचे उल्लंघन केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला. त्यावरून त्यांना संचालकपदावरून हटवण्यात आल्याचे सांगितले जात आहे. मात्र, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी आरबीआयचा हा दावा फेटाळला असून, ही एकतर्फी कारवाई असल्याचे सांगत याविरोधात थेट न्यायालयात दाद मागण्याची भूमिका घेतली आहे.

सतीश जाधव यांनी २५ मे २०२६ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेकडे एक तक्रार दाखल केली होती. सतीश जाधव हे लातूर जिल्हा बँकेचे सभासद आहेत. एखाद्या व्यक्तीने १० वर्षांपेक्षा जास्त काळ संचालकपद भूषवलेले असेल तर त्या व्यक्तीला पुढची निवडणूक लढवता येत नाही, तसा नियम आहे. हाच नियम बाबासाहेब पाटील यांनी मोडला आहे. लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या १९ संचालक मंडळातील ८ संचालक १० वर्षांपेक्षा जास्त काळ या पदावर आहेत. बाबासाहेब पाटील यांचाही यात समावेश असल्याचे तक्रारीत म्हटले होते.

या तक्रारीची आरबीआयने दखल घेतली. त्यानंतर आता आरबीआयने थेट राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांना संचालकपदावरून दूर केले. सतीश जाधव यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात या प्रकरणात याचिकाही दाखल केली होती. त्यानंतर न्यायालयाच्या आदेशानंतर बँकेच्या ८ पैकी एकूण ७ संचालकांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. बाबासाहेब पाटील यांनी मात्र संचालकपदाचा राजीनामा दिला नव्हता. त्यामुळे आरबीआय यांनी त्यांना पदावरून हटवले. मात्र, आरबीआयने आपल्यावर एकतर्फी कारवाई केल्याचे सांगत सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी या कारवाईविरोधात आपण न्यायालयात जाणार असल्याचे म्हटले.

आरबीआयने थेट राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्यावर कारवाई करीत त्यांचे जिल्हा बँकेचे संचालकपद रद्द केले. या निर्णयाविरोधात आता बाबासाहेब पाटील यांनी न्यायालयात दाद मागणार असल्याचे म्हटले आहे. आरबीआयच्या निर्णयाला ते आव्हान देणार आहेत. त्यामुळे आता संचालकपदाच्या लढाईत नेमके काय होणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## आधी दुष्काळी परिस्थितीचा आढावा; नंतर पंचनामे करू : मुख्यमंत्री फडणवीस

**● मुंबई । वीरभूमी–**

राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाचा खंड पडल्याने निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीचा सरकारने सविस्तरर आढावा घेण्यास सुरुवात केली आहे. पुढील आठवडाभरात आढावा घेण्यात येणार आहे. त्यानंतर प्रत्यक्ष पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीची मदत देण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. राज्यातील सर्व जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांकडून दुष्काळी परिस्थितीबाबत अहवाल मागविण्यात येणार आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

राज्यात गेल्या २ महिन्यांपासून अनेक भागांत पावसाने दडी मारली. त्यामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली. राज्यात सध्या सुमारे १७ टक्के पावसाची तूट निर्माण झाली आहे. विशेषत: मराठवाडा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रातील परिस्थिती अत्यंत बिकट आहे. पावसाअभावी खरीप पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. संपूर्ण खरीप हंगाम हातातून जाण्याची वेळ आल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील दुष्काळग्रस्त परिस्थितीचा सरकारकडून सविस्तर आढावा घेतला जाणार आहे. सर्व जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांकडून परिस्थितीबाबत अहवाल मागविण्यात येणार आहे. महसूल विभागाच्या वतीने पर्जन्यमान, पिकांची स्थिती, पिकांचे नुकसान, पाणीटंचाई आणि शेतकऱ्यांवरील परिणाम याबाबत सविस्तर सर्वेक्षण केले जाणार असल्याचे सांगण्यात आले.

पावसाअभावी अनेक भागांतील पिकांवर परिणाम झाला असून पिकांचा उतारा आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न घटण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. मुळातच पिके करपली असून, हंगामच वाया गेला आहे. मराठवाड्यात तर बिकट स्थिती आहे. त्यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे.

## नागरिकांना 'डिजिटल सापळ्यात' पकडले : राज ठाकरे

**● मुंबई । वीरभूमी–**

मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर आपले मत व्यक्त करत सरकारवर टीका केली आहे. ते म्हणाले, केंद्र सरकारने युपीआय व्यवहारांवर 'मर्चंट डिस्काउंट रेट' अर्थात सोप्या भाषेत युपीआय व्यवहारांवर अगदी सरसकट नाही पण शुल्क लावून भारतीयांवर मग ते व्यापारी असोत की, ग्राहक यांच्यावर, 'डिजिटल सापळा' लावल्याचा आरोप केला आहे.

नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया नुसार, १५ ऑक्टोबरपासून 'युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस' या रिअल-टाइम डिजिटल पेमेंट प्रणालीद्वारे व्यापाऱ्यांना (मर्चंट्सना) केल्या जाणाऱ्या २,००० रुपयांवरील पेमेंट्सवर ०.४ टक्के शुल्क आकारले जाणार आहे. मात्र युपीआय पेमेंट्सवर चार्जेस लागणार असल्याचे समोर येताच विरोधक आक्रमक झाले आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी देखील केंद्र सरकारवर निशाणा साधला आहे. २१ ऑगस्ट २०२२ ला सरकारने युपीआय व्यवहारांवर कुठलंही शुल्क असणार नाही, असे घोषित केल्याचा पुरावा देत राज ठाकरे यांनी भल्या मोठ्या पोस्टमधून टीका केली आहे.

आधी नोटबंदी करून मग आता आम्ही कसे डिजिटल व्यवहाराला चालना देतोय हे दाखवत युपीआय व्यवस्था आणली. मग त्याचा गाजवजा केला, स्वत:ची स्तुती करून घेतली, लोकांना सवय लावली आणि अचानक एकेदिवशी घोषित करून टाकले की आता या व्यवहारांवर शुल्क लागेल. थोडक्यात नागरिकांना गुंगवत ठेवले आणि हळूच 'डिजिटल सापळ्यात' पकडलं.

# मान्सूनचा परतीचा प्रवास सुरु

**पुढील चार-पाच दिवस राज्यात अनेक ठिकाणी पाऊस**

**● मुंबई । वीरभूमी–**

नैऋत्य मोसमी वाऱ्यांचा देशातून परतीचा प्रवास शनिवारी पश्चिम राजस्थानमधून सुरू झाला. यंदा तो दोन दिवस उशिराने परतत असून, ३-४ दिवसांत पंजाब व गुजरातच्या काही भागांतून माघार घेईल.

अंदमानमधील हवामान प्रणाली २३ सप्टेंबरपर्यंत तीव्र होऊन ओडिशा-आंध्र किनारपट्टीवर पोहोचण्याची शक्यता आहे. यामुळे दक्षिण भारत व पूर्व किनारपट्टीवर २५ सप्टेंबरपर्यंत पाऊस राहील. ओडिशा आणि आंध्र किनारपट्टीला २१ ते २४ सप्टेंबरदरम्यान मुसळधार पावसाचा 'ऑरेंज अलर्ट', तर केरळ, कर्नाटक, तामिळनाडू, तेलंगणा, बंगालसह ईशान्येकडील राज्यांना 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. महाराष्ट्रातही रविवारी सर्वत्र वादळी वाऱ्यांसह पावसाचा 'यलो अलर्ट' दिला आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरात गेल्या दोन महिन्यांपासून पावसाने दडी मारल्याने सप्टेंबर महिन्यात तापमानाने उच्चांक गाठला आहे. सप्टेंबरमध्ये पावसाने ओढ दिल्याने वातावरणातील आर्द्रता घटून उकाड्यात मोठी वाढ झाली आहे. वाढत्या उकाड्यामुळे सलग सहाव्या दिवशी शहराचे कमाल तापमान ३० अंशांच्या पुढे राहिले.



वाढत्या एल निनोच्या प्रभावामुळे वातावरणात हे मोठे बदल दिसत आहेत. नेहमी हमखास परतीचा पाऊस मिळणा-या मराठवाड्यात यंदा तुलनेत पाऊस कमी राहील तसेच आगामी मोसमात थंडीचा कडाकाही कमीच असण्याची शक्यता आहे.

जालना जिल्ह्यात गेल्या दीड महिन्यापासून पावसाने दिलेली उघडीप आता संपण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, सोमवार ते शुक्रवार या कालावधीत जिल्ह्यात पावसाची शक्यत असून, काही ठिकाणी मेघगर्जनेसह जोरदार सरी होण्याचा अंदाज आहे. या कालावधीत बहुतांश वेळ ढगाळ वातावरण राहणार असून, कमाल तापमानातही घट होण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात मागील आठवड्यात दोन वेळा तुरळक पाऊस झाला. मात्र, त्याचा फारसा परिणाम जाणवला नाही. त्यामुळे दीर्घकाळापासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांच्या नजरा आता पुढील पाच दिवसांच्या हवामानाकडे लागल्या आहेत. सध्या जिल्ह्यात कमाल तापमान ३२.७ अंश सेल्सियसच्या आसपास आहे.



# SPOT NEWS

## आ. विवेक कोल्हे यांच्या पाठपुराव्याने कोपरगाव आगारात सात नवीन बस येणार

**● कोपरगाव । वीरभूमी –**



आगारास सात नवीन राजमाता जिजाऊ बस उपलब्ध होणार आहे ही प्रवाशांसाठी दिलासादायक बाब आहे.कोपरगाव बस आगारात नव्याने सात एस.टी. बस मंजूर झाल्या आहेत. तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिक, विद्यार्थी, शेतकरी तसेच रोजंदारीसाठी प्रवास करणाऱ्या प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता उपलब्ध बसची संख्या अपुरी पडत होती. यामुळे अनेक मार्गांवर प्रवाशांना गैरसोयींचा सामना करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन आ.विवेक कोल्हे यांनी राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्रव्यवहार करून वारंवार मागणी लावून धरत कोपरगाव आगारासाठी नव्या बस उपलब्ध करून देण्याची विनंती करण्यात आली होती. त्यांच्या या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश मिळाले असून अखेर कोपरगाव आगारात सात नवीन बस मंजूर झाल्या आहेत. रविवारी या बस श्रीरामपूर येथून कोपरगांव आगार येथे आणल्या जाणार आहेत. या नव्या बसमुळे ग्रामीण भागातील प्रवाशांना अधिक सोयीस्कर व सुरक्षित प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. विशेषतः विद्यार्थ्यांना शाळा, महाविद्यालय तसेच स्पर्धा परीक्षा केंद्रांपर्यंत पोहोचण्यासाठी मोठा दिलासा मिळणार असून विविध मार्गांवरील बस फेऱ्यांमध्येही वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यापूर्वी पाच बसेस मा.आ.स्नेहलताताई कोल्हे यांच्या प्रयत्नातून उपलब्ध झाल्या होत्या त्याबद्दल तसेच नवीन सात बसेस दिल्याबद्दल आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी राज्य शासनाचे आभार व्यक्त केले. कोपरगाव मतदारसंघाच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी यापुढेही सातत्याने प्रयत्न सुरू राहतील, अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

## नगरच्या अमृतवेला बाबा श्रीचंद महाराज गुरुद्वारात २१ सप्टेंबरला गुरुपुरब सोहळा

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

तारकपूर येथील अमृतवेला बाबा श्रीचंद महाराज गुरुद्वारा येथे बाबा श्रीचंद महाराज गुरुपुरबनिमित्त रविवार, दि. २० सप्टेंबर आणि सोमवार, दि. २१ सप्टेंबर २०२६ रोजी विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या दोन दिवसीय सोहळ्यात आरती, गुरबाणी कीर्तन, शब्द, आनंद साहेब, अरदास, हुकमनामा तसेच गुरू का लंगर आदी कार्यक्रम होणार आहेत. बाबा श्रीचंद महाराज हे श्री गुरु नानक देव जी यांचे ज्येष्ठ सुपुत्र असून उदासी परंपरेचे संस्थापक म्हणून त्यांचे स्मरण केले जाते. उपलब्ध ऐतिहासिक स्रोतांनुसार त्यांचा जन्म ८ सप्टेंबर १४९४ रोजी सुलतानपूर लोधी येथे झाला. लहानपणापासूनच त्यांना अध्यात्म, योग, साधना आणि वैराग्याची ओढ होती. पुढे त्यांनी उदासी परंपरेच्या माध्यमातून अध्यात्मिक विचारांचा प्रसार केला. बाबा श्रीचंद महाराजांनी विविध प्रदेशांत भ्रमण करून अध्यात्म, ज्ञान, साधना आणि मानवकल्याणाचा संदेश दिल्याची परंपरा आहे. त्यांच्या परंपरेशी संबंधित अनेक डेरे, आश्रम, गुरुद्वारे आणि धार्मिक केंद्रे पुढे देशाच्या विविध भागांत निर्माण झाली. त्यांच्या जीवनाशी संबंधित बारठ साहिबसह अनेक स्थळांना आजही धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व आहे. अहिल्यानगरमधील अमृतवेला बाबा श्रीचंद महाराज गुरुद्वारा हा या आध्यात्मिक परंपरेचा वारसा जपणारे श्रद्धास्थान आहे. गुरुपुरबच्या निमित्ताने गुरुद्वारा परिसरात भाविकांच्या सोयीसाठी करण्यात आलेल्या शेड व फरशीच्या कामाचे लोकार्पण करण्यात येणार आहे. या कामासाठी मा. माजी खासदार डॉ. सुजय राधाकृष्ण विखे पाटील यांच्या निधीतून सहकार्य लाभले आहे. या कार्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. तसेच गुरुद्वाराच्या विकासासाठी सहकार्य व पाठबळ दिल्याबद्दल आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, नगरसेविका हरप्रीतकौर गंभीर, मोहित पंजाबी आणि गौरी अमित बोरकर यांचाही सत्कार करण्यात येणार आहे. या पवित्र गुरुपुरब सोहळ्यास अहिल्यानगर शहरातील तसेच परिसरातील सर्व भाविक, नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि सेवाभावी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या सोहळ्यासाठी वीराजी वाही, राजेंद्र कंट्रोड, जनक आहुजा, सतीश गंभीर, अमित थापर, किशोर कंट्रोड, जगजीतसिंह गंभीर, बलराम सचदेव, अवतार गुरली, चरणजीतसिंह गंभीर, हरजीतसिंग वाधवा, निप्पू धुप्पर, राजू जग्गी, पूनम खुल्लर, रेखा गुलाटी, लखू माटलाई आदी प्रयत्नशील आहेत.

# दिवाळीला सभासदांना १५० रुपयांचे अंतिम पेमेंट

### ५ ऑक्टोबरपासून गाळप सुरू । नागवडे कारखान्याच्या ६१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अध्यक्ष राजेंद्र नागवडे यांची घोषणा

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

पावसाअभावी निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचा आगामी गाळप हंगाम ५ ऑक्टोबरपासून सुरू करण्यात येणार आहे. तसेच दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सभासद शेतकऱ्यांना १५० रुपयांचे अंतिम पेमेंट वर्ग करून त्यांची दिवाळी गोड करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची घोषणा कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे यांनी केली.

कारखान्याची ६१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवारी (दि. १८) अध्यक्ष राजेंद्र नागवडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सभेत सभासदांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांना नागवडे यांनी उत्तरे दिली.

सभेस उपाध्यक्षा मेघा संदीप औटी, ज्येष्ठ नेते बाबासाहेब भोस, घनश्याम शेलार, माजी उपाध्यक्ष केशव मगर, भगवानराव पाचपुते, राजेंद्र मस्के, बाबासाहेब इथापे, बाळासाहेब गिरमकर, दत्तात्रय पानसरे, हरिदास शिर्के, विलासराव वाबळे, रावसाहेब काकडे, अरुण पाचपुते, सुरेश लोखंडे, ॲड. बाळासाहेब काकडे, हेमंत नलगे, कैलास फराटे, जिजाराम खामकर, पुरुषोत्तम लगड, खासेराव घाडगे, राजू जगताप, बाळकाका वाबळे, कार्यकारी संचालक प्रवीण शिंदे व शेकडो सभासद उपस्थित होते.

सभासद भाऊसाहेब पवार यांनी साखर आयुक्तालयाकडे दाखल केलेल्या २४ तक्रारींच्या अनुषंगाने नागवडे यांनी सविस्तर उत्तरे दिली. सहकार क्षेत्रातील विविध अडचणी तसेच खासगी व्यक्तींचे अतिक्रमण असतानाही कारखाना टिकवून ठेवण्यासाठी व्यवस्थापन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

> **माजी पदाधिकाऱ्यांची सभेत उपस्थिती; मात्र भाषण टाळले**
>
> ▪ माजी उपाध्यक्ष बाबासाहेब भोस, भगवानराव पाचपुते, केशवराव मगर आणि बाबासाहेब इथापे हे सभेला शेवटपर्यंत उपस्थित होते. मात्र, त्यांनी यावेळी भाषण न करता सभेतील घडामोडी शांतपणे ऐकून घेतल्या.

स्व. शिवाजीराव नागवडे यांनी कष्टातून उभी केलेली ही संस्था अनेक संकटांमधून मार्ग काढत आजही प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. ही सभासदांच्या प्रपंचाची काळजी घेणारी कामधेनू आहे. त्यामुळे संचालक, सभासद, शेतकरी, कर्मचारी आणि विरोधक या सर्वांचीच ती जपण्याची जबाबदारी आहे. मतभेद असले तरी सहकार टिकविण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे, असे नागवडे यांनी सांगितले.

सभेत घोड-कुकडी पाण्याचा प्रश्न तसेच डिंभे-माणिकडोह बोगद्याचा विषयही प्रामुख्याने चर्चेत आला. डिंभे-माणिकडोह बोगद्याचे काम मार्गी लागावे, तसेच साकळाई योजना घोड धरणाऐवजी पूर्वीच्या नियोजित आराखड्यानुसार विसापूर धरणातून राबविण्यात यावी, यासाठी तालुक्यातील सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करण्याची भूमिका सभासदांनी मांडली.

दुपारी दोन वाजता सुरू झालेल्या सभेत अनेक सभासदांनी संचालक मंडळाच्या कामकाजाचे कौतुक केले. सध्याच्या सहकार क्षेत्रातील




अडचणींच्या काळात कारखाना टिकवून ठेवला असून शेतकरी, वाहतूकदार आणि कर्मचाऱ्यांची देणी थकविली नसल्याबद्दल संचालक मंडळाचे अभिनंदन करण्यात आले. मात्र, सभेच्या उत्तरार्धात घनश्याम शेलार यांनी भाषण करताना प्रथम घोड-कुकडी पाणीप्रश्न आणि डिंभे-माणिकडोह बोगद्याच्या मुद्द्यावर सभासदांना एकत्र येण्याचे आवाहन केले. त्यानंतर त्यांनी कारखान्याच्या कारभारातील काही मुद्दे आणि वार्षिक अहवालातील त्रुटींवर प्रश्न उपस्थित केले. त्यामुळे सभेतील वातावरण काही काळ बदलले. शेलार यांच्या भाषणादरम्यान काही सभासदांनी आक्षेप घेतल्याने त्यांना आपले भाषण आवरते घ्यावे लागले.

सभेत प्रशांत दरेकर, दिनकर पंधरकर, शहाजी हिरडे, किरण नागवडे, श्रीपाद ख्रिस्ती, रामदास रायकर, पुरुषोत्तम लगड, अशोक नवले, हनुमंत झिटे, रुपेश इथापे, गोकुळ फराटे, डी. वाय. जगताप, बाबा मोहिते, तुकाराम कोकरे, रामदास जंजिरे, हरिभाऊ पाचपुते, भाऊसाहेब खेतमाळीस, नितीन फलके, उद्धव शितोळे, शंकर फराटे, शरद गद्रे, खंडू आरु, राजेंद्र भोस, अविनाश निंभोरे, नितीन नलगे, बापुराव देवकाते आणि राजेंद्र नवले यांनी विविध विषयांवर मते मांडली. प्रास्ताविक व सूत्रसंचालान संचालक सुभाष शिंदे यांनी केले तर आभार शरद जगताप यांनी मानले.

## वेदरूपी वृक्षाचे परिपक्व फळ म्हणजे श्रीमद् भागवत : महंत रामगिरी महाराज

**● कोपरगाव । वीरभूमी–**

वेद, उपनिषदे आणि पुराणांच्या ज्ञानपरंपरेत श्रीमद् भागवत महापुराणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. वेदरूपी वृक्षाचे परिपक्व व रसाळ फळ म्हणजे श्रीमद् भागवत होय. भागवत श्रवणातून भगवंतावरील भक्ती दृढ होते, जीवनाला सकारात्मक दिशा मिळते आणि मनाला शांतीचा अनुभव प्राप्त होतो, असे प्रतिपादन महंत रामगिरीजी महाराज यांनी केले.



गोदावरी बायो रिफायनरी लि. साकरवाडी गणेश उत्सव मंडळाच्या वतीने महंत रामगिरी महाराज यांच्या सुश्राव्य वाणीतून श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी श्रीमद् भागवताचे महात्म्य विशद करताना कथाव्यासांनी सांगितले की, श्रीमद् भागवत हे केवळ धार्मिक ग्रंथ नसून भक्ती, ज्ञान, वैराग्य आणि सदाचाराचा मार्ग दाखविणारे जीवनदर्शन आहे. माणसाच्या जीवनात अनेक प्रकारची सुख-दुःखे येत असतात. अशा परिस्थितीत भगवंताचे नामस्मरण, संतांचे विचार आणि भागवताचे श्रवण मनाला आधार देतात.

भागवत महापुराणामध्ये भगवान श्रीकृष्णाच्या विविध लीला, भक्तांचे चरित्र आणि भक्तीमार्गाचे महत्त्व सांगितले आहे. भागवत श्रवणाने अंतःकरणातील विकार दूर होऊन भगवंताच्या चरणी मन एकाग्र करण्याची प्रेरणा मिळते. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या व्यस्त जीवनातून वेळ काढून भागवत कथा ऐकावी.

वेदरूपी वृक्षाला उपनिषदांची पाने, पुराणांच्या कथा त्याच्या विविध शाखा आणि त्या वृक्षाचे परिपक्व, मधुर फळ म्हणजे श्रीमद् भागवत, अशी सुंदर उपमा देत भागवताचे महात्म्य कथेतून उलगडून सांगण्यात आले.

यावेळी संचालक सुहास गोडगे, प्रवीण विभुते, मधुकर महाराज, रामभाऊ महाराज, चंद्रकांत महाराज, पंचायत समितीचे माजी सभापती मच्छिंद्र टेके, पंचायत समिती सदस्य मधुकर टेके, नामदेव जाधव, शिवाजी ठाकरे, गणेश पाटील,कामगार वर्ग यांचेसह परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कथा, भजन, नामस्मरण आणि भक्तिमय वातावरणामुळे परिसरात आध्यात्मिक चैतन्य निर्माण झाले आहे. कथा कालावधीत दररोज भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रीमद् भागवत श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## खा. लंके यांच्या नेतृत्वात पारनेर बाजार समितीची आर्थिक भरारी; तोट्यातून चार कोटींच्या नफ्यात

**● पारनेर । वीरभूमी –**

पारनेर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीची २२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खासदार नीलेश लंके यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि सभापती गंगाराम बेलकर यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. बाजार समितीने आर्थिक प्रगती साधत सन २०२३ मधील तोट्याच्या स्थितीतून आज चार कोटी रुपयांच्या नफ्यात झेप घेतली असून राष्ट्रीयीकृत बँकेत ३ कोटी ७२ लाख रुपयांच्या ठेवी असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.



खासदार नीलेश लंके म्हणाले, बाजार समितीचा कारभार शेतकरी केंद्रित असला पाहिजे. शेतकरी जगला तरच बाजार समिती उर्जितावस्थेत येईल. त्यामुळे संचालक मंडळाने एकमताने निर्णय घेत शेतकऱ्यांना अधिकाधिक सुविधा कशा देता येतील, याचा विचार करावा. बाजार समितीच्या प्रगतीचे श्रेय व्यापारी, संचालक मंडळ आणि कर्मचारी वर्गाला असल्याचेही त्यांनी सांगितले.

बाजार समितीच्या जडणघडणीत योगदान देणारे दिवंगत व्यापारी पांडुरंग काळे तसेच मारुती रेपाळे, नंदकुमार देशमुख, राजेंद्र तारडे यांच्यासह अन्य व्यापाऱ्यांच्या योगदानाचा खासदार लंके यांनी गौरव केला. आदर्श शेतकरी आणि विद्यार्थ्यांचा बाजार समितीच्या वतीने करण्यात आलेला सन्मान हा प्रेरणादायी उपक्रम असून असे उपक्रम सातत्याने राबविण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

सभापती गंगाराम बेलकर यांनी सांगितले की, बाजार समितीला जागेची अडचण भासत असून पारनेर नगरपंचायतीने साडेदहा एकर जमीन उपलब्ध करून दिली आहे. यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला असून संचालक मंडळाकडून पाठपुरावा सुरू आहे. ही जागा उपलब्ध झाल्यानंतर बाजार समितीच्या विस्ताराला मोठी चालना मिळणार आहे.

पारनेर शहरातील २२ मीटर रुंदीच्या रस्त्याचे काम प्रगतीपथावर असून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी मुळा धरणाच्या बॅकवॉटरमधून पाणी आणण्याच्या योजनेचा प्रस्ताव मंजुरीच्या अंतिम टप्प्यात असल्याची माहितीही बेलकर यांनी दिली.

संचालक अशोक कटारिया यांनी कांद्याबरोबरच मूग, टोमॅटो, वाटाणा आणि डाळिंबासाठीही बाजार समितीत विक्री व्यवस्था निर्माण करण्याची गरज व्यक्त केली. जागा उपलब्ध झाल्यानंतर या सुविधा निर्माण करता येतील, असे त्यांनी सांगितले. भाळवणी येथे उपबाजार सुरू करण्यात आला असून टाकळी ढोकेश्वर येथेही उपबाजार सुरू करण्यासाठी सरपंच बाळासाहेब खिलारी यांनी जागा उपलब्ध करून दिल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी माजी सभापती बाबाजी तरटे, किसन रासकर, किसन सुपेकर, रा या औटी, बापूसाहेब शिर्के, शिवाजीशेठ बेलकर, अशोक सावंत, विजय पवार, अशोक कटारिया, मारुती रेपाळे, संदीप सालके, चंदन भळगट, पद्मजा पठारे, नगराध्यक्षा डॉ. विद्या कावरे, डॉ. श्रीकांत पठारे, योगेश मते, अर्जुन भालेकर, दीपक लंके, धोंडीभाऊ पुजारी, तुकाराम चव्हाण, भूषण शेलार यांच्यासह संचालक, व्यापारी, शेतकरी व मान्यवर उपस्थित होते.

सभापती गंगाराम बेलकर यांनी प्रास्ताविक केले. सचिव सुरेश आढाव यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. मोहन रोकडे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी बाजार समितीच्या वतीने आदर्श शेतकरी तसेच विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

## नितीनदादा कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्ताने संजीवनी युनिव्हर्सिटीमध्ये भव्य रक्तदान शिबीर उत्साहात

**● कोपरगाव । वीरभूमी–**

संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष नितीनदादा कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्त संजीवनी युनिव्हर्सिटी आणि रोटरी क्लब ऑफ कोपरगाव सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. समाजाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि मानवसेवेचा संदेश देण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिरास रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.




प्रारंभी संजीवनी युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट अमित कोल्हे यांचे हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. यावेळी व्हाईस चांसलर डॉ. ए. जी. ठाकुर, रोटरी क्लबचे अध्यक्ष श्री विक्रम लोढा, संजीवनी ब्लड बॅन्केच्या संचालिका नीता पाटील, संजीवनी शैक्षणिक संकुलातील विविध संस्थांचे डायरेक्टर्स, प्राचार्य, डीन, विभाग प्रमुख, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मानवी जीवन वाचविण्यासाठी रक्ताला कोणताही पर्याय नाही. अपघातग्रस्त रुग्ण, शस्त्रक्रिया, प्रसूती, थॅलेसेमिया, कर्करोग तसेच विविध गंभीर आजारांवरील उपचारांसाठी रक्ताची सतत आवश्यकता भासत असते. अशा वेळी एका रक्तदात्याने केलेले रक्तदान अनेक रुग्णांना नवजीवन देण्याचे कार्य करते. त्यामुळे रक्तदानाला सर्वश्रेष्ठ दानांपैकी एक मानले जाते. या विचारांना आधिन राहुन संजीवनी मध्ये अशा उपक्रमांचे नेहमी आयोजन करण्यात येते.

'रक्तदान हेच जीवनदान' या भावनेतून विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. रक्तदानामुळे केवळ गरजू रुग्णांचे प्राण वाचतात असे नाही, तर समाजात परस्पर सहकार्य, संवेदनशीलता आणि मानवतेची भावना अधिक दृढ होते. एखाद्या अनोळखी व्यक्तीचे जीवन वाचविण्याचे पुण्य रक्तदानातून मिळते, ही भावना प्रत्येक रक्तदात्याच्या चेहऱ्यावर दिसून येत होती.

रक्तदान हे केवळ वैद्यकीय गरज पूर्ण करणारे कार्य नसून मानवतेच्या सेवेला वाहिलेले एक श्रेष्ठ सामाजिक कर्तव्य आहे. माणसाच्या शरीरात निर्माण होणाऱ्या रक्ताचा काही अंश दान करून दुसऱ्या व्यक्तीला नवजीवन देण्याची संधी रक्तदानातून मिळते. त्यामुळे रक्तदानाला 'महादान' असे संबोधले जाते. रक्ताची निर्मिती कृत्रिमरीत्या करता येत नाही आणि त्याला कोणताही पर्याय उपलब्ध नाही. म्हणूनच प्रत्येक निरोगी व्यक्तीने नियमित रक्तदान करण्याची सवय जोपासणे ही काळाची गरज आहे, अशी भावना रक्तदात्यांच्या मनात दृढ झाल्याचे जाणवले.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी संजीवनी युनिव्हर्सिटी, रोटरी क्लब ऑफ कोपरगाव सेंट्रल तसेच विद्यार्थी विकास कक्षाचे डायरेक्टर प्रा. चैतन्य काळे, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. गणेश फोपसे व प्रा. सुप्रिया भागवत आणि स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

# महिंद्रातर्फे XUV 3XO REVX श्रेणीचा विस्तार

### XUV 3XO REVX EDGE सादर । सुरुवातीची किंमत ९.३९ लाख रुपये

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेडने XUV 3XO REVX श्रेणीचा विस्तार करत XUV 3XO REVX EDGE सादर केली आहे. या नव्या प्रकाराची सुरुवातीची एक्स-शोरूम किंमत ९.३९ लाख रुपये आहे. यासोबतच पेट्रोल ऑटोमॅटिक ट्रान्समिशनसह XUV 3XO REVX M(O) प्रकारही बाजारात दाखल करण्यात आला असून त्याची एक्स-शोरूम किंमत ९.९९ लाख रुपये आहे.

REVX EDGE मुळे पॅनोरॅमिक सनरूफसह प्रीमियम वैशिष्ट्ये १० लाख रुपयांपेक्षा कमी किमतीच्या श्रेणीत उपलब्ध झाली आहेत. २६.०३ सेमी HD इन्फोटेनमेंट सिस्टीम, अँड्रॉइड ऑटो व पल कारप्ले, क्रूझ कंट्रोल, लेदरेट सीट्स आणि रिअर-व्ह्यू कॅमेरा यांसारखी वैशिष्ट्ये या श्रेणीत देण्यात आली आहेत.

२०२४ मध्ये सादर झाल्यापासून XUV 3XO ने २.५ वर्षांपेक्षा कमी कालावधीत २.५ लाखांहून अधिक विक्रीचा टप्पा ओलांडला आहे. कंपनीच्या माहितीनुसार, हा टप्पा गाठणारी XUV 3XO ही महिंद्राची सर्वात वेगवान एसयूव्ही ठरली आहे.

**REVX EDGE : प्रीमियम वैशिष्ट्यांचा समावेश**

XUV 3XO REVX EDGE मध्ये ड्युअल-टोन रूफ, बॉडी-कलर्ड ग्रिल आणि ब्लॅक व्हील कव्हर्स देण्यात आले आहेत. आतील भागात ब्लॅक लेदरेट सीट्स, २६.०३ सेमी HD इन्फोटेनमेंट सिस्टीम, चार स्पीकर्स, स्टीअरिंग-माउंटेड ऑडिओ कंट्रोल्स, क्रूझ कंट्रोल आणि रिअर-व्ह्यू कॅमेरा यांचा समावेश आहे.

याशिवाय उंची समायोजित करता येणारी ड्रायव्हर सीट, रिअर एसी व्हेंट्स, कप होल्डरसह रिअर आर्मरेस्ट आणि विविध स्टोरेज सुविधा देण्यात आल्या आहेत.

REVX EDGE दोन इंजिन पर्यायांमध्ये उपलब्ध आहे. १.२ लिटर mStallion TCMPFi पेट्रोल इंजिनसोबत MT व AT, तर १.५ लिटर Turbo Diesel with CRDe इंजिनसोबत MT पर्याय देण्यात आला आहे.

**REVX EDGE (O) मध्ये पॅनोरॅमिक सनरूफ**

REVX EDGE (O) प्रकारात एज्मधील वैशिष्ट्यांव्यतिरिक्त पॅनोरॅमिक सनरूफ, रूफ रेल्स, इलेक्ट्रिकली फोल्ड करता येणारे जठतची, पॅसिव्ह कीलेस एंट्री, पुश-बटन स्टार्ट, ऑटोमॅटिक हेडलॅम्प्स आणि ऑटोमॅटिक वायपर्स देण्यात आले आहेत.

**एक्स-शोरूम किंमती**

| प्रकार | १.५ L Turbo Diesel MT | १.५ L Turbo Diesel AMT | १.२LmStallion TCMPFi MT | १.२LmStallion TCMPFi AT |
|---|---|---|---|---|
| REVX M(O) | - | - | - | ९.९९ लाख |
| REVX EDGE | १०.५९ लाख | - | ९.३९ लाख | १०.५९ लाख |
| REVX EDGE (O) | ११.०९ लाख | ११.९१ लाख | ९.८९ लाख | ११.०९ लाख |



दोन्ही EDGE प्रकारांमध्ये ६ एअरबॅग्स, इलेक्ट्रॉनिक स्टॅबिलिटी कंट्रोल (ESC), ISOFIX चाइल्ड-सीट माउंट्स, रिव्हर्स पार्किंग सेन्सर्स, थ्री-पॉइंट सीट बेल्ट्स आणि सर्व प्रवाशांसाठी सीट-बेल्ट रिमाइंडर्स यांसह ३५ मानक सुरक्षा वैशिष्ट्ये देण्यात आल्याचे कंपनीने म्हटले आहे.

**पेट्रोल AT सह REVX M(O)**

XUV 3XO REVX M(O) मध्ये आता पेट्रोल ऑटोमॅटिक ट्रान्समिशनचा पर्याय उपलब्ध झाला आहे. या प्रकाराची एक्स-शोरूम किंमत ९.९९ लाख रुपये आहे. त्यामुळे REVX श्रेणीमध्ये १० लाख रुपयांपेक्षा कमी किमतीत ऑटोमॅटिक ट्रान्समिशनचा पर्याय उपलब्ध झाला आहे.

नवीन प्रकार एव्हरेस्ट व्हाइट, स्टेल्थ ब्लॅक, टँगो रेड, नेब्युला ब्ल्यू आणि गॅलेक्सी ग्रे या रंगांमध्ये उपलब्ध आहेत.

महिंद्राच्या मते, नव्या REVX प्रकारांमुळे ग्राहकांना प्रीमियम वैशिष्ट्यांसोबत पेट्रोल व डिझेल इंजिन तसेच मॅन्युअल, ऑटोमॅटिक आणि AMT अशा विविध पॉवरट्रेन पर्यायांची निवड मिळणार आहे.

SPOT NEWS



## रेल्वे स्टेशन परिसरात साकारले 'वृंदावन'; गौरी-गणपतीच्या सजावटीने वेधले लक्ष

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील रेल्वे स्टेशन आनंदनगर परिसरात गौरी–गणपती आगमनाचा उत्साह पाहायला मिळाले. शुक्रवारी (दि. १८ सप्टेंबर) मोनिका गणेश लालबागे यांच्या निवासस्थानी 'वृंदावनात गौरी–गणपतीचे आगमन' या संकल्पनेवर आधारित आकर्षक सजावट करण्यात आली. भगवान श्रीकृष्ण आणि राधेच्या प्रेममय वृंदावनाची अनुभूती देणाऱ्या या सजावटीने परिसरातील महिलांचे विशेष लक्ष वेधून घेतले. लालबागे यांच्या घराच्या पहिल्या पायरीपासूनच वृंदावनाची संकल्पना साकारण्यात आली होती. भगवान श्रीकृष्ण आणि राधेची मनमोहक प्रतिकृती, फुलांची आकर्षक सजावट तसेच बासरीच्या माध्यमातून वृंदावनातील भक्तिमय वातावरण निर्माण करण्यात आले. घराच्या प्रवेशद्वारापासूनच सजावटीचे बारकावे लक्ष वेधून घेत होते. घराच्या परिसरात साकारण्यात आलेली भगवान श्रीकृष्णाची आकर्षक रांगोळी सजावटीचे विशेष आकर्षण ठरली. विविध रंगांच्या माध्यमातून साकारलेल्या या रांगोळीने परिसरातील महिलांचे लक्ष वेधून घेतले. घराबाहेर फुलांची केलेली सजावट आणि बासरीच्या प्रतिकृतीमुळे संपूर्ण परिसराला वृंदावनाचे स्वरूप प्राप्त झाले होते. गौरी–गणपतींच्या सभोवतालीही आकर्षक सजावट करण्यात आली होती. विविध वस्तू आणि खाद्यपदार्थांची कलात्मक मांडणी करून गौरी–गणपतींच्या पुढील भागाची सजावट करण्यात आली. पारंपरिक श्रद्धा आणि आधुनिक कल्पकता यांचा सुंदर मिलाफ या सजावटीत पाहायला मिळाला. आडत व्यापारी गणेश लालबागे यांच्या परिवारासह नातेवाईक आणि आप्तेष्टांनी ही आकर्षक सजावट साकारण्यासाठी परिश्रम घेतले. घराभोवती करण्यात आलेल्या विद्युत रोषणाईनेही सजावटीला अधिक आकर्षक रूप प्राप्त झाले होते.

## आ. काशिनाथ दाते यांच्या माध्यमातून वेताळबाबा स्टेडियम सुशोभीकरणासाठी १५ लाखांचा निधी

**● निघोज । वीरभूमी–**

निघोज येथील वेताळबाबा स्टेडियमच्या सुशोभीकरण व विविध विकासकामांसाठी आमदार काशिनाथ दाते यांच्या माध्यमातून १५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या निधीतून महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, चेंजिंग रूम तसेच १८ बाय ३० फुटांचे पत्रा शेड आदी कामे करण्यात येणार आहेत. लवकरच या विकासकामांना सुरुवात होणार असल्याची माहिती स्टेडियमचे सर्वेसर्वा तथा आजी–माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी मेजर विकास वराळ यांनी दिली. या निधीसाठी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त विठ्ठलराव कवाद व रोहिदास लामखडे यांनी पुढाकार घेतला. आमदार दाते यांचे समर्थक कार्यकर्ते व मेजर विकास वराळ यांनी पारनेर येथे आमदार दाते यांची भेट घेऊन स्टेडियमच्या विकासासाठी निवेदन सादर केले होते. तसेच आवश्यक प्रस्तावही तयार करून देण्यात आला होता. निघोज येथे पुष्पावती नदीकिनारी सुमारे चार एकर जागेवर ग्रामस्थ, आजी–माजी सैनिक संघटना, खेळाडू आणि दानशूर व्यक्तींच्या लोकसहभागातून वेताळबाबा स्टेडियम उभारण्यात आले आहे. गेल्या पाच वर्षांत टप्प्याटप्प्याने विविध कामे करून या ठिकाणी भव्य क्रीडांगण उभे राहिले आहे. निघोज व पंचक्रोशीतील शेकडो नागरिक सकाळी ६ ते ९ या वेळेत स्टेडियमवर व्यायाम, चालणे तसेच क्रिकेट, व्हॉलीबॉल आदी खेळांचा सराव करतात. सकाळ–संध्याकाळ येथे युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच महिलांची मोठी उपस्थिती असते. त्यामुळे चेंजिंग रूम व स्वच्छतागृहांची आवश्यकता निर्माण झाली होती. याबाबत मेजर विकास वराळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी विठ्ठलराव कवाद व रोहिदास लामखडे यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर त्यांनी आमदार दाते यांच्याशी संपर्क साधून प्रस्ताव व निवेदन सादर केले. या पाठपुराव्यानंतर स्टेडियमच्या विकासासाठी १५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाल्याचे कवाद व लामखडे यांनी मेजर वराळ यांना सांगितले. निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मेजर विकास वराळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी आमदार काशिनाथ दाते यांचे आभार मानले. लवकरच आमदार दाते, समर्थक कार्यकर्ते आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत या विकासकामांचे भूमिपूजन करण्यात येणार असल्याचे मेजर वराळ यांनी सांगितले.

# दुष्काळाचे सावट हटू दे, बळीराजा सुखी होवू दे

## आ. आशुतोष काळेंची विघ्नहर्त्याच्या चरणी प्रार्थना



**● कोपरगाव । वीरभूमी –**

तालुक्यासह संपूर्ण राज्यात चालूवर्षी समाधानकारक पाऊस पडलेला नाही. कोपरगाव मतदार संघात जवळपास मागील दीड महिन्यापासून पावसाने ओढ दिल्यामुळे बळीराजाच्या चिंता वाढल्या आहेत.अस्मानी संकटाला न घाबरता बळीराजा नेहमीच मोठ्या धाडसाने व हिमतीने प्रत्येक संकटाला सामोरे गेला आहे. त्यामुळे जरी आजपर्यंत समाधानकारक पाऊस झाला नसला तरी यापुढील काळात कोपरगाव मतदार संघासह संपूर्ण राज्यात भरपूर पाऊस पडू दे, दुष्काळाचे सावट हटू दे आणि बळीराजा सुखी होवू दे अशी प्रार्थना सर्व गणेश भक्तांच्या वतीने आमदार आशुतोष काळे यांनी विघ्नहर्त्याच्या चरणी केली.

सालाबाद प्रमाणे याहीवर्षी कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर गणेशोत्सव उपसमितीच्या वतीने श्री गणेशाची प्रतिष्ठापना करण्यात आली असून त्यानिमित्ताने श्री.सत्यनारायण महापूजा कारखान्याचे चेअरमन आमदार आशुतोष काळे व त्यांच्या सुविद्य पत्नी जिल्हा बँकेच्या माजी संचालिका सौ.चैतालीताई काळे यांच्या शुभ हस्ते पार पडली यावेळी ते बोलत होते.

यावेळी आमदार आशुतोष काळे पुढे म्हणाले की, गणपती बाप्पा हे १४ विद्या आणि ६४ कलांचे अधिष्ठाता असून, संकटसमयी भक्तांच्या पाठीशी उभे राहणारे विघ्नहर्ते दैवत आहे. राज्यातील शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत असून, पिकांवर आलेले संकट आणि दुष्काळाचे सावट दूर होण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याचे डोळे आभाळाकडे लागले आहेत. अशा या कठीण प्रसंगी विघ्नहर्त्या गणरायाच्या चरणी कोपरगाव तालुक्यासह संपूर्ण महाराष्ट्रावर कृपादृष्टी राहावी, राज्यात सर्वदूर परतीचा दमदार पाऊस पडावा, शेतशिवार हिरवेगार व्हावे आणि बळीराजाच्या जीवनात पुन्हा सुख–समृद्धी यावी, अशी प्रार्थना राज्यातील शेतकरी व सर्व गणेशभक्तांच्या वतीने केली आहे.

याप्रसंगी कारखान्याचे कार्यकारी संचालक सोमनाथ बोरनारे, जनरल मॅनेजर सुनिल कोल्हे, आसवनी विभागाचे जनरल मॅनेजर ज्ञानेश्वर आभाळे, सेक्रेटरी बाबासाहेब सय्यद,असि.सेक्रेटरी संदीप शिरसाठ, विविध विभागाचे खाते प्रमुख, गणेशोत्सव उपसमितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य, कारखाना व सर्व संलग्न संस्थांचे पदाधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉक्टरांनी सेवा भाव जपावा : डॉ. सतिष महाजन

**● अकोले । वीरभूमी –**




वैद्यकीय क्षेत्र हे केवळ व्यवसाय नसून समाजसेवेचे प्रभावी माध्यम आहे. डॉक्टरांनी आपल्या ज्ञान, कौशल्य आणि अनुभवाचा उपयोग समाजातील गरजू, वंचित आणि दुर्गम भागातील नागरिकांच्या सेवेसाठी करीत सेवा भाव सातत्याने जपला पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. बाळासाहेब विखे पाटील ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सतिष महाजन यांनी केले.

अकोले तालुका मेडिकल असोसिएशनच्या वतीने आयोजित 'आत्मा गणेश उत्सव २०२६' अंतर्गत डॉक्टर आणि समाजकारणातील संधी या विषयावर आयोजित परिसंवादात ते बोलत होते. यावेळी डॉ बाळासाहेब पाटील विखे ग्रामीण वैद्यकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ सुरेश जगदाळे, प्रशासकीय अधिकारी विकास घुले, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भाटे यांच्या सह वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर डॉक्टर अकोले तालुका मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. संदीप कडलग, सचिव डॉ. प्रतीक घोडके, खजिनदार डॉ. निलेश सहाने, तसेच डॉ. नितीन चासकर, प्रोजेक्ट डायरेक्टर डॉ.रविंद्र डावरे, डॉ. प्रकाश वाकचौरे, डॉ. तुषार गावडे, डॉ. सुभाष सोमण, डॉ. मंजुश्री रहाणे, डॉ उमा कुलकर्णी यांच्या सह वैद्यकीय व्यवसाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. महाजन म्हणाले की, डॉक्टर हा समाजातील विश्वासार्ह घटक आहे. रुग्णाच्या उपचाराबरोबरच त्याच्या कुटुंबीयांना मानसिक आधार देणे, आरोग्यविषयक जनजागृती करणे आणि समाजातील गरजू घटकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविणे हीदेखील डॉक्टरांची सामाजिक जबाबदारी आहे. विशेषतः आदिवासी व दुर्गम भागात अनेक नागरिकांना अद्याप दर्जेदार आरोग्यसेवा सहज उपलब्ध होत नाही. अशा ठिकाणी वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांनी पुढाकार घेऊन सेवा उपक्रम राबविण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

वैद्यकीय ज्ञानाला जेव्हा सेवाभावाची जोड मिळते, तेव्हा उपचार हे केवळ आजारापुरते मर्यादित राहत नाहीत, तर समाजाच्या आरोग्याचा पाया मजबूत करण्याचे कार्य घडते, असे डॉ.जगदाळे यांनी सांगितले.

परिसंवादाच्या माध्यमातून डॉक्टरांनी आपल्या व्यावसायिक जबाबदारीसोबतच सामाजिक बांधिलकी जपावी, आरोग्य शिबिरे, जनजागृती उपक्रम आणि गरजू रुग्णांसाठी विविध सेवाकार्यांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, यावर विचारमंथन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सतीश वाळूंज यांनी केले तर आभार डॉ. रवींद्र डावरे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.सागर कोल्हाळ, डॉ. संतोष तिकांडे, डॉ.सतीष चासकर, डॉ. तेजस शहा डॉ. अद्वैत देशपांडे, डॉ. संतोष देशमुख सह आत्मा कार्यकारणीने विशेष प्रयत्न केले.

## अभ्यासातूनच जीवनात परिवर्तन घडते : सचिन राख

### जय भगवान प्रतिष्ठानतर्फे नांदूर निंबादैत्य शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**● पाथर्डी । वीरभूमी–**



विद्यार्थ्यांनी नियमित वाचन, सातत्याने अभ्यास आणि शिकवलेला अभ्यासक्रम पुन्हा पुन्हा सरावाने आत्मसात केला, तर ज्ञानाची भक्कम पायाभरणी होते. शिक्षण आणि अभ्यासाच्या बळावरच माणसाच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडते, असे प्रतिपादन गटशिक्षणाधिकारी सचिन राख यांनी केले.

नांदूर निंबादैत्य येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत जय भगवान युवा प्रतिष्ठानच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना वही व पेन, तसेच गरजू विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे वाटप करण्यात आले. गुरुवारी दुपारी आयोजित या उपक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी सचिन राख होते.

यावेळी बोलताना सचिन राख यांनी विद्यार्थ्यांना नियमित अभ्यासासोबतच वाचनाची सवय लावण्याचे आवाहन केले. शिकवलेला विषय केवळ ऐकून न घेता त्याचा वारंवार सराव केल्यास तो चांगल्या प्रकारे आत्मसात होतो, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन जय भगवान प्रतिष्ठानच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध उपक्रमांचे तसेच प्रतिष्ठानचे अध्यक्ष आजिनाथ दहिफळे यांच्या मोफत शिकवणी वर्गाचे त्यांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांनी या मोफत शिकवणीचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शक्य तितकी मदत करण्याचा माझा सातत्याने प्रयत्न राहील, अशी भावना जय भगवान युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष आजिनाथ दहिफळे यांनी व्यक्त केली.

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बाबासाहेब वाघ यांनी शाळेच्या भौतिक सुविधा तसेच प्रशासकीय बाबींसाठी आवश्यक सहकार्य करण्याचे आवाहन गटशिक्षणाधिकारी व उपस्थित मान्यवरांना केले. यावेळी इयत्ता सातवीतील विद्यार्थिनी प्रगती दौंड हिने उत्स्फूर्त मनोगत व्यक्त करून शैक्षणिक साहित्य मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

कार्यक्रमास शिक्षक ज्ञानेश्वर लाड, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बाबासाहेब वाघ, जय भगवान युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष आजिनाथ दहिफळे, पालक, ग्रामस्थ व शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जेष्ठ साहित्यिक व शिक्षक डॉ. कैलास दौंड यांनी केले. सूत्रसंचालन महारुद्र बडे यांनी केले, तर आभार विश्वास पालवे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक काशिनाथ दौंड, शारदा फुंदे आणि उद्धव दौंड यांनी विशेष परिश्रम घेतले. जय भगवान प्रतिष्ठानच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळण्याबरोबरच त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळाले.

## सज्जनांचा अपमान करू नये; अन्यथा कुळाचा नाश होतो : महंत रामगिरी महाराज

**● कोपरगाव । वीरभूमी–**

सज्जनांचा कधीही अपमान करू नये. ज्या व्यक्ती किंवा समाजाकडून सज्जनांचा अवमान होतो, त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतात. रावणाने बिभीषणासारख्या सज्जनाचा अपमान केला आणि त्याच्या अहंकारामुळे रावणाच्या कुळाचा नाश झाला. त्याचप्रमाणे कौरवांनी विदुरांसारख्या नीतिमान व सज्जन व्यक्तीचा अवमान केला. त्यातून महाभारताचे युद्ध घडले आणि कौरव वंशाचा विनाश झाला, असे प्रतिपादन महंत रामगिरी महाराज यांनी केले.

श्रीमद् भागवत कथा प्रवचनात ते बोलत होते. विदुर आणि मैत्रेय यांची भेट, तसेच महाभारतातील घटनांचा संदर्भ देताना त्यांनी सज्जनांचे मार्गदर्शन आणि त्यांचे महत्त्व स्पष्ट केले.

महंत रामगिरी महाराज म्हणाले की, युद्ध सुरू करणे सोपे असते; मात्र ते थांबविणे अत्यंत कठीण असते. आज जगातील विविध देशांमध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. युद्धामध्ये केवळ सैनिकच नव्हे, तर सामान्य नागरिक, कुटुंबे, अर्थव्यवस्था आणि संपूर्ण समाजव्यवस्था उद्ध्वस्त होते. युद्ध संपते तेव्हा अनेकदा विजय–पराजयापेक्षा दोन्ही बाजूंचे मोठे नुकसान झालेले असते.

कौरव आणि पांडव यांच्यातील युद्ध टाळण्याची संधी होती. भगवान श्रीकृष्णांनी धृतराष्ट्रासह



कौरवांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला; मात्र हट्ट, अहंकार आणि सत्तेच्या मोहामुळे योग्य मार्ग स्वीकारला गेला नाही. परिणामी महाभारताचे विनाशकारी युद्ध झाले. या युद्धात मोठ्या प्रमाणावर मनुष्यहानी झाल्याचे महाभारतात वर्णन आढळते.

विदुर हे सत्य, नीती आणि विवेकाचे प्रतीक होते. त्यांनी धृतराष्ट्राला अनेकदा योग्य–अयोग्याची जाणीव करून दिली. मात्र सत्तेचा मोह आणि पुत्रमोह यामुळे धृतराष्ट्राला विदुरांचे मार्गदर्शन स्वीकारता आले नाही. त्यामुळे कुटुंबातील मतभेदाचे रूपांतर विनाशकारी संघर्षात झाले.

आजच्या काळातही या कथांमधून समाजाने बोध घेण्याची गरज आहे. सज्जनांचा सन्मान, सत्याचा स्वीकार आणि संवादातून मतभेद सोडविणे हीच शांततेची वाट आहे. अहंकार, हट्ट आणि सूडभावना यांचा मार्ग स्वीकारला तर त्याचे परिणाम व्यक्तीपासून कुटुंबापर्यंत आणि समाजापासून राष्ट्रापर्यंत घातक ठरू शकतात, असेही महंत रामगिरी महाराज यांनी सांगितले.

दरम्यान कथे प्रसंगी वैजापूरचे आमदार रमेश बोरणारे, चंद्रपूरचे जिल्हा न्यायाधीश शिवाजीराव गुळवे, गोदावरी दुधसंघाचे अध्यक्ष राजेश परजणे,पोलिस निरीक्षक रमेश गोडगे आदींनी भेट देऊन महाराजांचे आशीर्वाद घेतले.

यावेळी संचालक सुहास गोडगे, प्रवीण विभुते, मधुकर महाराज, रामभाऊ महाराज, चंद्रकांत महाराज, पंचायत समितीचे माजी सभापती मच्छिंद्र टेके, पंचायत समिती सदस्य मधुकर टेके, गणेश पाटील, बद्रीनाथ जाधव, वसंत भाकरे, लक्ष्मण चौधरी कामगार वर्ग यांचेसह परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीक्षेत्र वृद्धेश्वर बेल आरती उत्सव समितीची स्थापना

## अध्यक्षपदी अविनाश मंत्री, उपाध्यक्षपदी प्रसाद म्हस्के । समन्वयक मुरलीधर पालवे यांची घोषणा

**● पाथर्डी । वीरभूमी –**

नाथ संप्रदायाची जन्मभूमी म्हणून देशभर परिचित असलेल्या श्रीक्षेत्र वृद्धेश्वर येथे बेल आरती उत्सव समितीच्या मंडळाची घोषणा समन्वयक मुरलीधर पालवे यांनी केली. समितीच्या अध्यक्षपदी पाथर्डी येथील जेष्ठ सेवेकरी अविनाश मंत्री तर उपाध्यक्षपदी तिसगाव येथील युवा सेवेकरी प्रसाद म्हस्के पाटील यांची सर्वानुमते निवड घोषित करण्यात आली.

श्रीक्षेत्र वृद्धेश्वर येथे श्रावण शुद्ध प्रतिपदा ते भाद्रपद शुद्ध षष्ठी अशी सव्वा महिना रात्री आठ वाजता बेल आरती होते. विशाल अशी शिवपिंड मंत्रोच्चारासह बेलपत्रांनी अच्छादित होऊन त्यानंतर अत्यंत आकर्षक अशी फुलांची सजावट होते. या सजावटीसाठी पुणे, संभाजीनगर, अहिल्यानगर, बीड, जिल्ह्यातील भावीक सुद्धा आवर्जून फुले घेऊन येतात. आरतीच्या वेळी नाथ



संप्रदायांमध्ये असलेले सर्व सिद्ध पुरुष वायुरूपाने आरतीच्या वेळी आवारामध्ये उपस्थित असतात अशी चर्चा श्रद्धेने भाविक करतात.

यावेळी वेगळेच चैतन्य उपस्थितांना अनुभवायला मिळते. वृद्धेश्वराची भूमी अत्यंत चैतन्यमय असून येथे नतमस्तक होणाऱ्या भाविकाला निश्चितपणे तशी अनुभूती येते. आरती सुरू होण्यापूर्वीचे गाभाऱ्यासह आवारातील धावपळीचे वातावरण व आरती सुरू झाल्यानंतरचे चैतन्यदायी वातावरण सहजपणे कुणालाही अनुभवता येते. ब्रह्मवृंदांकडून विविध प्रकारच्या स्तोत्रांच्या शुद्ध स्वरूपातील सामूहिक उच्चाराने अशा चैतन्यदायी वातावरणामध्ये वाढ होते. मंदिराचा गाभारा छोटा असल्याने गाभाऱ्याबाहेर व आवारातही भाविक ध्यानस्थ बसून आरती श्रवण करतात. शिवतत्वाशी एकरूपता साधण्यासाठी सुमारे ४० मिनिटे भाविक शांतपणे आदिनाथाचे चिंतन करतात.

भाद्रपद शुद्ध सप्तमीला महाप्रसादाने बेल आरती उत्सवाची सांगता झाली. पाथर्डीचे सेवेकरी पोपटराव शिरसाट यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात आला. बेल आरती उत्सव समितीचे समन्वयक मुरलीधर पालवे यांनी जाहीर केलेली कार्यकारणी अशी मंडळाचे सचिव नानासाहेब चोथे, खजिनदार म्हणून तिसगावचे सुदर्शन सावंत व सतीश दारकुंडे. तर सदस्य म्हणून शुभम चितळे, सुरज केदार, ज्ञानेश्वर पाठक, अशोक शिदोरे, करंजीचे संतोष अकोलकर, तिसगावचे श्रेयस डागा यांची नावे जाहीर करण्यात आली.

यावेळी देवस्थान समितीचे प्रतिनिधी कर्मचारी वर्ग पुजारी व पुरोहित वर्ग मंडळाचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजकीय पराभवांनी खचले नाहीत; बापूंनी समाजकारणाची वाट सोडली नाही : प्रा. ज्ञानदेव गायकवाड

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**



राजकारणात अनेक वेळा जनतेने अपयश दिले, तरी लोकनेते स्व. शिवाजीराव नागवडे (बापू) यांनी समाजकारणाची वाट कधीच सोडली नाही. राजकीय पराभवानंतरही कार्यकर्त्यांना धीर देत नव्या संघर्षाची ऊर्जा देणारा हा नेता होता. मात्र, तालुक्याच्या जनतेने बापूंना अखेरपर्यंत अपेक्षित न्याय दिला नाही, अशी खंत संत साहित्याचे अभ्यासक प्रा. ज्ञानदेव गायकवाड यांनी व्यक्त केली.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात स्व. शिवाजीराव नागवडे यांच्या आठव्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित अभिवादन सभेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी होते. शिक्षण संस्थेचे निरीक्षक सचिन लगड, प्रा. थोपटे व संस्थेचे विश्वस्त प्रा. सुरेश रसाळ प्रमुख उपस्थित होते.

यावेळी प्रा. गायकवाड म्हणाले, खऱ्याला खरं आणि खोट्याला खोटं सांगण्याची स्पष्टवक्तेपणाची भूमिका बापूंनी आयुष्यभर जपली. दुष्काळाने होरपळलेल्या शेतकऱ्यांसाठी ढोकराईच्या माळरानावर सहकारी साखर कारखाना उभा करून त्यांनी शेतकऱ्यांच्या दारात समृद्धीची बीजे पेरली. सहकाराबरोबरच शिक्षण क्षेत्रातही त्यांनी डोंगराएवढे काम उभे केले. पाणी आणि वीज प्रश्नांसाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला.

राजकीय पराभवानंतरही बापूंच्या सभा विजयी सभांपेक्षा मोठ्या होत. नाराज व खचलेल्या कार्यकर्त्यांना आधार देत ते पुन्हा संघर्षासाठी उभे करीत. काटकसरी स्वभाव, बारकाईने काम करण्याची पद्धत आणि कमालीचा धीरोदात्तपणा ही त्यांच्या कार्याची वैशिष्ट्ये होती.

सचिन लगड यांनी बापूंच्या आठवणींना उजाळा दिला. प्राचार्य डॉ. सूर्यवंशी यांनी महाविद्यालयाला 'ए प्लस' राष्ट्रीय मानांकन मिळवून देणे हे बापूंचे स्वप्न होते, ते पूर्ण झाल्याचे सांगितले. नीती, चारित्र्य, एकनिष्ठपणा आणि प्रामाणिकपणा अंगीकारणे हीच बापूंना खरी श्रद्धांजली ठरेल, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. धर्मनाथ काकडे यांनी केले, तर आभार उपप्राचार्य प्रा. चंद्रभान कातोरे यांनी मानले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

वीरभूमी गणपती बाप्पा मोरया

■ रविवार, दि. २० सप्टेंबर २०२६

# 'सेल्फी विथ गणेशा'



■ वीरभूमी-'सेल्फी विथ गणेशा' : चांगदेव चौधरी, रा. आहिल्यानगर



■ वीरभूमी-'सेल्फी विथ गणेशा' : शिवशक्ती मित्र मंडळ, पिंपळगाव माळवी, ता. अहिल्यानगर



■ वीरभूमी-'सेल्फी विथ गणेशा' : सागर संजयराव एडके व परिवार, रा. माजलगाव, जि. बीड



■ वीरभूमी-'सेल्फी विथ गणेशा' : नामदेव कुरले, चावला, प्रकाश मुनोत, अमरेश सिंह, विनोद गांधी, देशपांडे, श्रीराम टेबेंकर, आप्पासाहेब कुलकर्णी, सर्जेराव कचरे, देसाई साहेब रा. विरभद्रनगर, बाणेर



■ वीरभूमी-'सेल्फी विथ गणेशा' : केशर टावर, मल्हारवाडी रोड, ता. राहुरी




■ वीरभूमी-'सेल्फी विथ गणेशा' : हिंदवी अमोल मुने, ढोरगल्ली, पाथर्डी, जि. अहिल्यानगर



■ वीरभूमी-'सेल्फी विथ गणेशा' : माही खेडकर आणि शलाका अजिंक्य खेडकर, रा. फुलेनगर, पाथर्डी, जि. अहिल्यानगर



■ वीरभूमी-'सेल्फी विथ गणेशा' : लक्ष्मी माता तरुण मंडळ, सुरोसे वस्ती, अंतरवाली बुद्रुक, ता. शेवगाव



■ वीरभूमी-'सेल्फी विथ गणेशा' : अंकुश जगताप व सौ. प्रियंका जगताप, रा. कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी



■ वीरभूमी-'सेल्फी विथ गणेशा' : शंभू वाघमारे व छाया जाधव, रा. शेवगाव, जि. अहिल्यानगर



■ वीरभूमी-'सेल्फी विथ गणेशा' : शनिकुमार बलदिन पाटील, रा. गोवठणे, ता. उरण



■ वीरभूमी-'सेल्फी विथ गणेशा' : अथर्व येमुल, मानस कोमटी, कृष्णा श्रीगादी, रियांश गळांगे, प्रथमेश येमुल, यथार्थ बुरगूल, संस्कृती येमुल व आराध्या येमुल रा. श्रमिकनगर, अहिल्यानगर



■ वीरभूमी-'सेल्फी विथ गणेशा' : श्रद्धा अमोल मुने, ढोरगल्ली, पाथर्डी, जि. अहिल्यानगर




■ वीरभूमी-'सेल्फी विथ गणेशा' : एकता प्रतिष्ठाण ट्रस्टच्या ३४ व्या गणेशोत्सवात मंडळाने उभारलेली ६० फूट रुंद, १३ फूट उंच तिरुपती बालाजी मंदिराची भव्य प्रतिकृती.

**तुमचाही सेल्फी पाठवा आणि उद्याच्या पानात स्वतःला पहा!**

**येथे पाठवा आपले फोटो**

९४२०८०२१४५

mahadevdale@gmail.com

www.veerbhuminews.com
WhatsApp contact

व्हाट्स अ‍ॅप क्यू आर कोड स्कॅन करा.